# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः09.04.2025** **वारःबुधवार**

---

१.पंतप्रधानांच्या उपस्थितीत नवकार महामंत्र दिवस विशेष कार्यक्रम नवी दिल्लीमध्ये सुरू,
२.बिम्सटेक देशांच्या कृषिमंत्र्यांची आज नेपाळमध्ये काठमांडू इथं बैठक,
३.परदेश दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज स्लोवाकियामध्ये दाखल,
४.अमेरिकेत होणाऱ्या चिनी मालाच्या आयातीवर आजपासून १०४ टक्के शुल्क लागू होणार,
आणि
५.म्यानमाच्या विनाशकारी भूकंपातील मृतांची संख्या आता ३ हजार ६४५ वर.

**<u>नवकारमंत्र</u>**

आज नवकार महामंत्र दिवस आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्ली इथं यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विशेष कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. आज सकाळी आठ वाजता हा कार्यक्रम विज्ञान भवन इथं सुरू झाला आहे. याप्रसंगी पंतप्रधान उपस्थितांशी संवादही साधतील. नवकार महामंत्र दिवस हा आध्यात्मिक सुसंवाद आणि नैतिक जाणीवेचा एक महत्त्वपूर्ण उत्सव समजला जातो. “जैन धर्मातील आदरणीय आणि सार्वत्रिक जप असलेला नवकार महामंत्र सामूहिक पठणाद्वारे लोकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न करतो. अहिंसा, नम्रता आणि आध्यात्मिक उन्नतीच्या तत्त्वांमध्ये रुजलेला हा मंत्र ज्ञानी प्राण्यांच्या सद्गुणांना चालना देत आंतरिक परिवर्तनाला प्रेरणा देतो. हा दिवस सर्व व्यक्तींना आत्मशुद्धी, सहिष्णुता आणि सामूहिक कल्याणाच्या मूल्यांवर चिंतन करण्यास प्रोत्साहित करतो”, असं मोदी यांनी आपल्या प्रसारमाध्यमांवरील पोस्टमध्ये म्हटलं आहे. शांती आणि एकतेसाठी जागतिक पातळीवर केल्या जाणाऱ्या या जपाच्या पठणामध्ये आज १०८ पेक्षा अधिक देशांतील लोक सामील होणार आहेत.

**<u>उमेदकायदा</u>**

वक्फ सुधारणा कायद्याची  अधिसूचना केंद्र सरकारनं काल जारी केल्यानं हा कायदा आता देशभरात लागू झाला आहे. आता या कायद्याचं ‘उमेद’ असं नवीन नाव असेल. गेल्या आठवड्यात संसदेनं याला मंजुरी दिल्यानंतर राष्ट्रपतींनी त्यावर स्वाक्षरी केली होती. यामुळं वक्फ बोर्डाचं मालमत्ता व्यवस्थापन पारदर्शक होणार असून वक्फ बोर्ड आणि स्थानिक प्रशासनातलं सामंजस्य वाढणार आहे.

**<u>मोदी</u>**

दरम्यान, “संसदेत वक्फ सुधारणा विधेयक, २०२५ मंजूर होणं  हे सामाजिक न्यायाच्या दिशेनं एक महत्त्वाचं पाऊल आहे. वक्फचं पावित्र्य आता जपलं जाईल आणि उपेक्षित, महिला आणि मुलांचे हक्क सुरक्षित राहतील”, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. मुस्लिमांसह सर्व समुदायांच्या हिताचं रक्षण करणारा उल्लेखनीय कायदा लागू केल्याबद्दल संसदेचं अभिनंदन करताना पंतप्रधान काल रात्री नवी दिल्ली इथं एका खाजगी माध्यमसंस्थेनं आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते.

२०२५ वर्षाच्या पहिल्या शंभर दिवसांत सरकारनं केवळ निर्णय घेतले नाहीत तर भविष्यासाठी एक मजबूत पायाही घातला आहे. गेल्या शंभर दिवसांतील कामगिरीवरून भारत त्याच्या प्रगतीत अढळ आहे, असं पंतप्रधान मोदी यांनी अधोरेखित केलं. या काळात भारत उपग्रह डॉकिंग आणि अनडॉकिंग क्षमता प्राप्त करणारा जगातील चौथा देश बनला, असंही मोदी यांनी स्पष्ट केलं.

**<u>बिम्सटेक बैठक</u>**

बिम्सटेक देशांच्या कृषिमंत्र्यांची आज नेपाळची राजधानी काठमांडू इथं बैठक होत आहे. देशांमधील कृषिक्षेत्र फायदेशीर बनवणं आणि त्यासाठी परस्पर आदानप्रदान वाढवणं हा त्यामागचा हेतू असून याविषयी तज्ज्ञांच्या सहाय्यानं यामध्ये चर्चा आणि विचारविनिमय

होणार आहे. केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या अध्यक्षतेखाली भारताचं प्रतिनिधिमंडल या बैठकीत सहभागी होत आहे.

**<u>करार</u>**

केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान आणि इस्रायलचे कृषीमंत्री अवी डिचर यांनी काल नवी दिल्ली इथं कृषी क्षेत्रातल्या द्विपक्षीय सहकार्याशी संबंधित करारांवर स्वाक्षऱ्या केल्या. आगामी काळात अन्न सुरक्षेच्या आव्हानांना सामोरे जाण्याच्या रणनीतीसंदर्भात बैठकीत चर्चा झाल्याचं त्यांनी सांगितलं.

**<u>राष्ट्रपती</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू सध्या पोर्तुगाल आणि स्लोव्हाकियाच्या दौऱ्यावर आहेत. पोर्तुगालचा यशस्वी राजकीय दौरा संपवून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज सकाळी दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात स्लोवाकियाची राजधानी ब्रातिस्लावा इथं पोहोचल्या. राष्ट्रपतींचा पोर्तुगाल दौरा हा गेल्या २७ वर्षांतील भारतीय नेत्यांचा पोर्तुगालचा पहिलाच राजकीय दौरा होता. त्यामुळे हा दौरा उभय देशांमधील राजनैतिक संबंधांमधील एक महत्त्वाचा टप्पा असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सचिव तन्मय लाल यांनी प्रसारमाध्यमांना सांगितलं.
त्यापूर्वी काल राष्ट्रपतींची पोर्तुगालचे पंतप्रधान लुईस मॉन्टेनेग्रो यांच्याबरोबर बैठक झाली. यामध्ये दोन्ही नेत्यांनी विविध द्विपक्षीय आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केली. विविध क्षेत्रात परस्पर सहकार्य वाढविण्याच्या गरजेवर दोन्ही नेत्यांनी भर दिला. राष्ट्रपती आणि पंतप्रधान मॉन्टेनेग्रो यांच्यातील उच्चस्तरीय चर्चेव्यतिरिक्त विविध स्तरांवर द्विपक्षीय चर्चा झाल्याचंही लाल यांनी नमूद केलं.

राष्ट्रपतींचा आज सुरू झालेला स्लोव्हाकियाचा राजकीय दौरा हाही एक ऐतिहासिक दौरा आहे. २९ वर्षांनंतर हा दौरा होत असून त्यामध्ये भारताचे राष्ट्रपती आणि स्लोवाकियाचे अध्यक्ष पीटर पेलेग्रिनी यांच्यात शिष्टमंडळ स्तरावरील चर्चा आणि बैठक होईल. स्लोवाकियाचे पंतप्रधान रॉबर्ट फिको यांचीही राष्ट्रपती भेट घेणार असून स्लोवाकियाच्या राष्ट्रीय परिषदेचे अध्यक्ष रिचर्ड रासी यांच्याशीही राष्ट्रपतींची चर्चा होणार आहे.

**चीनशुल्कअमेरिका**

अमेरिकेत होणाऱ्या चिनी मालाच्या आयातीवर आजपासून १०४ टक्के शुल्क लागू होणार असल्याची घोषणा व्हाईट हाऊसच्या माध्यम सचिव कॅरोलिन लेविट यांनी काल केली. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेल्या घोषणेनुसार, चीनला ३४ टक्के निर्यात शुल्क वाढीचा सामना करावा लागणार होता. मात्र चीनने अमेरिकन उत्पादनांवर लागू केलेलं शुल्क न हटवल्यानं अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी चीनला लागू होणाऱ्या शुल्कात ५० टक्के वाढ केली आहे. त्यामुळे चीनकडून अतिरिक्त ८४ टक्के शुल्क आकारलं जाईल. त्याचबरोबर युरोपियन महासंघासह इतर डझनभर देशांना ११ टक्के ते ५० टक्क्यांपर्यंत नवीन कर शुल्क लागू होणार आहे.

**म्यानमारभूकंप**

म्यानमाला झालेल्या विनाशकारी भूकंपातील मृतांची संख्या आता ती  ३ हजार ६४५ वर पोचली आहे. एकंदर ५ हजार १७ लोक जखमी झाले असून, १४८ नागरीक अजूनही बेपत्ता असल्याची माहिती स्थानिक राज्य प्रशासनानं  काल संध्याकाळी दिली आहे. २८ मार्चला झालेल्या भूकंपानंतर कालपर्यंत ९८ भूकंपाचे धक्के बसल्याचं म्यानमाच्या हवामानशास्त्र आणि जलविज्ञान विभागानं म्हटलं आहे. यामध्ये  सागाइंग, मंडाले आणि मॅगवे या प्रमुख शहरांमधल्या ८० टक्क्यांहून अधिक इमारतींचं नुकसान झालं आहे. दरम्यान, भारताच्या ऑपरेशन ब्रह्मासह युरोपीय राष्ट्र, अमेरिका, संयुक्त राष्ट्रांसह आंतरराष्ट्रीय संघटनांनी म्यानमामध्ये मदत आणि बचाव पथकं पाठवली आहेत.

**आरबीआयपतधोरण**

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची गेले तीन दिवस सुरू असलेल्या  बैठकीचा आज समारोप होत आहे. बँकेचे  गव्हर्नर संजय मल्होत्रा गेल्या दोन दिवसांत घेतल्या गेलेल्या निर्णयांची घोषणा करतील आणि मग बैठकीचा समारोप होईल. रेपो दराव्यतिरिक्त

भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा अंदाज, चलनवाढीची स्थिती, ग्राहक मूल्य निर्देशांकातील चलनवाढ आणि सकल देशांतर्गत उत्पादन वाढीचा अंदाज याविषयी मल्होत्रा प्रसारमाध्यमांशी संवाद साधण्याची शक्यता आहे. पतधोरण समितीची बैठक ७ एप्रिल रोजी सुरू झाली होती. गव्हर्नर यांच्या बैठकीचं थेट प्रक्षेपण बँकेच्या यूट्यूब वाहिनीवर पाहाता येणार आहे. व्यवसायिक बँकाना होणाऱ्या मिळणाऱ्या अल्पकालीन निधीवर रेपो दराचा परिणाम होत असल्यानं या संदर्भातल्या निर्णयाकडे सर्वांचं लक्ष असेल.

**<u>मुख्यमंत्री</u>**

महाराष्ट्रातील सर्वच भागात गुंतवणूकीसाठी अनुकूल वातावरण तयार केलं जात आहे. त्यामुळे येत्या पाच वर्षांत राज्याचा संतुलित विकास झाल्याचं चित्र दिसेल, असा विश्वास महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. ते काल मुंबईत इंडिया ग्लोबल फोरम नेक्स्ट - २५ या कार्यक्रमात बोलत होते. यावेळी मुख्यमंत्र्यांनी राज्याच्या विकासाचा आराखडा उपस्थितांसमोर मांडला.

महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी नवनवीन संधी निर्माण होत असून, कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातही महाराष्ट्र देशात आघाडीवर असल्याचं त्यांनी सांगितलं. राज्य सरकारनं केलेल्या सामंजस्य करारातील ८५ टक्के करार मार्गी लागत असून उर्वरित २० टक्के करार प्रत्यक्षात येण्यासाठी विशेष लक्ष देण्यात येत असल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी नमूद केलं.

सामंजस्यकरार

दरम्यान, याच कार्यक्रमात मुंबई महानगर क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या  विकासासाठी काल राज्याचे चार कंपन्यांशी ४ लाख ७ हजार कोटींचे विविध सामंजस्य करार करण्यात आले. या करारामुळे, MMR क्षेत्राच्या आणि पुण्याच्या विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं.

**बँकविलीनीकरण**

‘एक राज्य एक प्रादेशिक ग्रामीण बँक’ या तत्त्वानुसार ४३ प्रादेशिक बँकांच्या एकत्रिकरणाची अधिसूचना केंद्रीय वित्तीय सेवा विभागानं जारी केली आहे. त्यानुसार राज्यात विदर्भ प्रादेशिक ग्रामीण बँकेचं महाराष्ट्र प्रादेशिक ग्रामीण बँकेत विलीनीकरण केलं जाईल. येत्या ०१ मे पासून हे विलिनीकरण प्रत्यक्षात येणार असून या एकत्रित बँकेचं मुख्यालय छत्रपती संभाजीनगरमध्ये असेल.

**नक्षलवादी**

छत्तीसगडमध्ये बिजापूर जिल्ह्यात २२ नक्षलवाद्यांनी काल शरणागती पत्करली. त्यातल्या चौघांवर २६ लाख रुपयांचं बक्षीस लावण्यात आलं होतं. यावर्षी आत्तापर्यंत बिजापूर जिल्ह्यात १८० नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली आहे.

**कॉँग्रेसबैठक**

काँग्रेसच्या केंद्रीय कार्यकारिणीची बैठक काल गुजरातमध्ये अहमदाबाद इथं झाली. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे, काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह दीडशे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. या बैठकीत पक्षाच्या पुनर्बांधणीबाबत चर्चा झाल्याचं काँग्रेसचे महासचिव के. सी. वेणुगोपाल यांनी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना सांगितलं.

**वेव्हज**

वेव्हज उपक्रमाअंतर्गत आयोजित ‘टूथ टेल हॅकेथॉन’च्या पहिल्या ५ विजेत्यांची नावं जाहीर झाली आहेत. युनिकॉर्न, अल्केमिस्ट, व्हूशिंग लायर्स, बग स्मॅशर्स, आणि व्होर्टेक्स स्क्वाड या संघांना १० लाख रुपयांचं बक्षीस मिळालं आहे. चुकीची माहिती पसरु नये याकरता कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करुन उपाय शोधून काढल्याबद्दल हे सामायिक बक्षीस नवी दिल्ली इथं आयोजित कार्यक्रमात देण्यात आलं. या स्पर्धेसाठी जगभरातून पाच हजार सहाशे प्रवेशिका आल्या होत्या. वेव्ज परिषद येत्या १ ते ४ मे दरम्यान मुंबईत होणार आहे.

**<u>आयएसएसएफविश्वकरंडक</u>**

अर्जेंटिनामध्ये सुरू असलेल्या आयएसएसएफ विश्वकरंडक स्पर्धेत, काल विजयवीर सिधू याने पुरूषांच्या २५ मीटर रॅपीड फायर पिस्तुल प्रकारात भारताला पहिलं सुवर्णपदक मिळवून दिलं. तर महिला श्रेणीत सुरूची सिंगनं १० मीटर एअर रायफल प्रकारात वैयक्तिक सुवर्णपदक पटकावलं.

**<u>आईपीएल</u>**

आयपीएल क्रिकेटमध्ये काल पंजाब किंग्जने चेन्नई सुपरकिंग्ज संघाचा अठरा धावांनी पराभव केला. दुसऱ्या सामन्यात लखनौ सुपर जायंटस् संघाने कोलकाता नाईट रायडर्सचा चार धावांनी पराभव केला.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.